ा :- कात्रज

तालुका :- हवेली

जिल्हा :- पुणे

ांक व उपविभाग ७९/८१अ/८०/७६/४

ं व उपविभाग ७९/८१अ/८०/७६/४

शेताचे स्थानीक नाव :

भोगवटादार वर्ग - २

| आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फेरफार क्र |
|---|---|---|---|---|---|---|
| .आर.चौ.मी | ३९४४ | सरकार जमा | ०.६८.२५ | | | (३४७५०) |
| ोग्य क्षेत्र<br>.२४.२५ | ५२८२ | भारती विदयापिठ पुणे | १.५१.०० | | | (१७९९५) |
| | ८८४८ | सरहद . . | ०.४०.०० | | | (१८०२८) |
| .२४.२५ | ८८४९ | विजय फौंडेशन पुणे | ०.४०.०० | | | (१९११८) |
| ेत्र<br>प्रयोग्य) | ८८५० | [ मा अध्यक्ष ए एन एस चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई | ०.१५.०० | | ] | (३४७५०) |
| | १७४४९ | सुनिल चंदरराव मारणे | ०.२५.०० | | | (२३२२८) |
| ०,००.०० | | | | | | |
| ३.२४.२५ | | | | | | |
| ०.०० | | | | | | |
| विशेष | | | | | | |

कुळ, खंड व इतर अधिकार

कुळाचे नाव व खंड

इतर अधिकार
सक्षम प्राधिकार्याच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरास बंदी - गृह निर्माण संस्था/औदोगीक आस्थापना/शैक्षणीक संस्था यांना वाटप जमीन (२९३५०)

इतर
अॅ.जी.नागपुर ऑडीट पॅरा भु८/८९/९० रक्कम रुपये ३,१३,५११-चा बोजा (११३५७)

नवीन अविभाज्य शर्त
१८०२८ (१७९९५)

इतर
धारणाधिकार वर्ग १ क्षेत्र २५ आर (२३८९५)

[ इतर ](३३४६९)

[भारती सह बँक लि. यांचा र. रु. ५५०००००० /- चा बोजा सुनिल मारणे याच्या हि. ](३३४६९)

बोजा
विजय फौडेशन पुणे यांचा हिश्यावर पुणे महानगरपालिका यांचा मिळकतकर थकबाकी र.रु.२००२२०४/- चा बोजा (३३६२७)

बोजा - सहकारी बँक
दिनांक ११/०३/२०२० रोजी भारती सहकारी बँक लि पुणे चा सुनिल चंदरराव मारणे यांच्या नावे र.रु.४००००००० /- कर्ज. (३३६४६)

[ इतर ](३४८२२)

[सरहदद यांना भाडेपटयाने १५ वर्षाकरीता ३२५० चौ मी ओपनस्पेज ](३४८२२)

भाडे तत्वाने
सरहद संस्थेला भाडेपटयाने ३० वर्षाकरीता (दिनांक ०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०४८ पर्यत) क्षेत्र ३२५० चौ.मी ओपनस्पेस (क्रिडांगणासाठी) (३४८२२)

प्रलंबित फेरफार : नाही.

शेवटचा फेरफार क्रमांक : ३४८२२ व दिनांक : २५/०६/२०२१

सीमा आणि भुमापन चिन्हे

र क्र : (५८९४) (१६६४६) (१८०२८) (१९११८) (१९२१४) (१९४३२) (२२४५८) (२४३११) (२९३५०) (३१६६७)



हा ७/१२ अभिलेख (दि.२५/०६/२०२१:११:०४:५३ PM रोजी) डिजिटल स्वाक्षरीत केला असल्यामुळे त्यावर कोणंत्याही सही-शिक्क्याची आवश्यकता नाही.

सदर ७/१२ डिजिटल स्वाक्षरीत झाल्यानंतर -
सुचना १ : गा.न.नं. ७ मध्ये प्रलंबित असलेल्या फेरफार क्र.३५२६९ ची सद्यस्थिती http://mahabhumi.gov.in/aaplichawdi या संकेत स्थळावर पहावी.
सुचना २ : गा.न.नं. १२ मध्ये पिकांची माहिती अद्यावत झाली आहे परंतु सदर नोंदी या ७/१२ वर उपलब्ध नाहीत.
७/१२ डाउनलोड दि. : ३०/०४/२०२२ : ११:३९:४५ AM. वैधता पडताळणीसाठी https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dsr/ या संकेत स्थळावर जाऊन 2507100001292706 हा क्रमांक

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

**[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम २९ ]**

गाव :- कात्रज    तालुका :- हवेली    जिल्हा :- पुणे

भुमापन क्रमांक व उपविभाग    ७९/८१७अ/८०/७६/४

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | | | | | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्षे | हंगाम | खाते क्रमांक | | | | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | |
| | | | | | | | हे.आर.चौ.मी | हे.आर.चौ.मी | | हे.आर.चौ.मी | हे.आर.चौ.मी | | हे.आर.चौ.मी | | |
| २०१६-१७ | खरीप | | | | | | | | | | | बांधकाम पड | ३.२४२५ | | |
| २०१७-१८ | खरीप | | | | | | | | | | | बांधकाम पड | ३.२४२५ | | |
| २०१८-१९ | खरीप | | | | | | | | | | | बांधकाम पड | ३.२४२५ | | |

टीप-: *४ - मिश्रणाचा संकेत क्रमांक, *५ - जल सिंचित, *६ - अजल सिंचित

हा ७/१२ अभिलेख (दि.२५/०६/२०२१:११:०४:५३ PM रोजी) डिजिटल स्वाक्षरीत केला असल्यामुळे त्यावर कोणत्याही सही-शिक्क्याची आवश्यकता नाही.



सदर ७/१२ डिजिटल स्वाक्षरीत झाल्यानंतर -

सुचना १ : गा.न.नं. ७ मध्ये प्रलंबित असलेल्या फेरफार क्र.३५२६९ ची सद्यस्थिती http://mahabhumi.gov.in/aapllchawdi या संकेत स्थळावर पहावी.

सुचना २ : गा.न.नं. १२ मध्ये पिकांची माहिती अद्यायत झाली आहे परंतु सदर नोंदी या ७/१२ वर उपलब्ध नाहीत.

७/१२ डाउनलोड दि. : ३०/०५/२०२२ : ११:३९:४५ AM. वैधता पडताळणीसाठी https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dsr/ या संकेत स्थळावर जाऊन 2507100001292706 हा क्रमांक

वाचले:- १) अध्यक्ष, सरहद रा. सरहद भवन, पुणे-कश्मिर मैत्री चौक, सं.नं. १३०-१३३ (जुना) ७४/४,७९,८०,८१ (नवीन) भारती विदयापीठाचे मागे, कात्रज पुणे ४११०४६ यांचा, दि. १६/०१/२०१८ रोजीचा अर्ज
२) मा. अवर सचिव, महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन ३४०३/सीएम३१५/प्र.क्र.पु.३६५/ज-५ दि. २४/०८/२००४
३) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/९८५/२००४ दि.२१/१२/२००४
४) तहसिलदार हवेली यांचेकडील क्र.जमीन-१/कावि/२३/२०२१, दि.२२/०१/२०२१
५) कार्यकारी अभियंता, पुणे महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र. ५/२११५ दि.२२/०१/२०२१
६) शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८
७) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ७

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र. पमह/सीआर/०४/२०२१
पुणे १ दिनांक:- २४/०३/२०२१

**विषय:-** मौजे कात्रज ता. हवेली जि.पुणे येथील (सं.नं. ७९-८०-८१-७६/४) नवीन सं.नं. ७९/८१अ/८०/७६/४ मधील ३२५०.०० चौ.मी जागेवरील खुले क्षेत्र (ओपन स्पेस) भाडेपट्टयाची मुदतवाढ देणेबाबत...

आदेश/-

ज्याअर्थी, अध्यक्ष, सरहद रा. सरहद भवन, पुणे-कश्मिर मैत्री चौक, सं.नं. १३०-१३३ (जुना) ७४/४,७९,८०,८१ (नवीन) भारती विदयापीठाचे मागे, कात्रज पुणे ४११०४६ यांनी या कार्यालयाकडे दि. १६/०१/२०१८ रोजी अर्ज करुन मौजे कात्रज ता. हवेली जि.पुणे येथील स.नं. ७९-८०-८१-७६ मधील ३२५०.०० चौ.मी खुले क्षेत्र (ओपन स्पेस) शाळेच्या क्रिडांगणासाठी भाडेपट्टयाची मुदतवाढ मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

२. त्याअनुषंगाने तहसिलदार हवेली यांनी त्यांचेकडील क्र.जमीन-१/कावि/२३/२०२१, दि.२२/०१/२०२१ अन्वये चौकशी करून या कार्यालयाकडे अहवाल सादर केलेला आहे. तसेच तहसिलदार हवेली यांनी दि.२२/०२/२०२१ रोजीच्या अहवालान्वये तक्रार अर्जदार ग्राहक हक्क संघर्ष समिती ग्राहक सेवा संस्था तर्फे आनंद राजहंस यांनी शर्तभंगाबाबत केलेल्या तक्रारीमध्ये तथ्य नसलेचे कळविलेले आहे.

३. सरहद संस्था , पुणे यांना शासन महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन जमीन ३४०३/सीएम३१५/प्र.क्र.पु.३६५/ज-५ दि. २४/०८/२००४ अन्वये मौजे कात्रज ता. हवेली जि.पुणे येथील नवीन सं.नं. ७९-८०-८१-७६/४ मधील ३२५०.०० चौ.मी खुले क्षेत्र शाळेच्या क्रिडांगणासाठी या कार्यालयाकडील आदेश क्र.पमह/९८५/२००४ दि.२१/१२/२००४ अन्वये प्रती वर्ष रक्कम रुपये ४२/- प्रमाणे भाडेपट्टयाने १५ वर्षाकरीता प्रदान करण्यात आले आहे.

४. ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलेल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्टयाचे नुतनीकरण करताना जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाडयाची रक्कम आकारुन मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून ३० वर्षाचे भाडेपट्टयाची मुदतवाढ देण्यात यावी. अशी मुदतवाढ देताना ज्या भाडेपट्टयांचा कालावधी या शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी संपुष्टात आलेला व ज्या भाडेपट्टयांचे अद्याप नुतनीकरण करण्यात आलेले नाही, अशा भाडेपट्टयांचे मानीव नुतनीकरण भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून दि.३१.१२.२०१७ पर्यंत जुन्या दराने भुईभाडे वसुल करुन करण्यात यावे व दि.०१.०१.२०१८ पासुन प्रस्तुत धोरणानुसार भुईभाडे वसुल करुन भाडेपट्टयाचे पुढील नुतनीकरण करण्यात यावे अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

sarhad

प्रस्तुत संस्थेस जमीनीच्या वार्षिक मुल्यदर तक्त्याच्या विवरण पत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकन रक्कम रुपये ८,७६,५२,५००/- या रकमेच्या १० टक्के रक्कम रुपये ८७६५२५०/- या रकमेच्या ०.१ टक्का रक्कम रुपये ८७६६/- **इतकी होत आहे.** त्यानुसार दिनांक १६/११/२०१८ रोजीचे शासन निर्णयानुसार दिनांक २०/१२/२०१९ ते दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत दोन वर्षाचे नवीन दराने भुईभाडे म्हणून होणारी एकुण रक्कम रुपये १७५३२/- इतकी रक्कम रुपये संस्थेने दि.०९/०३/२०२१ रोजी GRN No. MH०१२९१५७३४२०२०२१M अन्वये (GRAS) प्रणालीव्दारे शासकीय खजिन्यात जमा केले असून सदर चलन डिफेस झाले आहे.

त्याअर्थी **मी, डॉ राजेश देशमुख, जिल्हाधिकारी पुणे,** मला प्रदान केलेल्या अधिकारन्वये शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८ मधील तरतुदीनुसार अध्यक्ष, सरहद, यांना मौजे कात्रज ता. हवेली जि.पुणे येथील (सं.नं. ७९-८०-८१-७६/४) नवीन सं.नं. ७९/८१अ/८०/७६/४ मधील ३२५०.०० चौ.मी जागेवरील खुले क्षेत्र (ओपन स्पेस) शाळेच्या क्रिडांगणाच्या क्षेत्रास मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून खालील अटी व शर्तीवर दि. ०१/०१/२०१८ पासून दि.३१/१२/२०४८ या ३० वर्षाकरीता भाडेपट्टयास मुदतवाढ देणेस मंजुरी देत आहे.

**अटी व शर्ती:-**

१. प्रस्तुत संस्थेस क्रिडांगणाच्या भाडेपट्टयाचे मुदतवाढ दिलेल्या क्षेत्राचा वापर त्याच प्रयोजनासाठी करणे प्रतिग्रहीता संस्थेस बंधनकारक राहील.
२. प्रस्तुत संस्थेस मुळ जमीन प्रदान केलेल्या आदेशातील अटी शर्ती प्रतिग्रहीता संस्थेस बंधनकारक राहतील.
३. शासन निर्णय दि.१६ नोव्हेंबर, २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे क्रिडांगणाच्या जमिनीच्या दरसाल प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी वार्षिक भुईभाडयाची रक्कम शासनाकडे/ तहसिलदार हवेली/तलाठी यांचेकडे भरणे संस्थेस बंधनकारक राहील.
४. सदर संस्थेच्या क्रिडांगणाचे क्षेत्राकरीता भाडेपट्टयाची मुदत ही दि.०१/०१/२०१८ पासून दि.३१/१२/२०४८ या ३० वर्षाकरीता असून तशी नोंद ७/१२ चे इतर हक्कात घेण्यात यावी.
५. सदर संस्थेस मुदतवाढ दिलेल्या भाडेपट्टयाच्या जागेबाबत शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-०५/२००६/ प्र.क्र.४३/ज-१, दि.३१ ऑक्टोबर, २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.
६. विषयांकीत मिळकतीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दि.२१/१२/२००४ रोजीच्या मुळ जागा प्रदान आदेशातील अटी शर्ती अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहतील.
७. विषयांकीत मिळकतीवर ऊभारण्यात उभारण्यात आलेल्या क्रिडांगण/ शैक्षणिक संकुलाच्या इमारतीमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागाकडुन घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा, तसेच सार्वत्रिक निवडणुका, राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन राबविण्यात येणारे सार्वजनिक उपक्रम यासाठी वेळोवेळी सदरची खुली जागा, जागेवरील इमारत व तदनुषंगिक उपलब्ध असलेली तांत्रिक यंत्रसामुग्री, तांत्रिक मनुष्यबळ विनासायास व विनामुल्य तातडीने उपलब्ध करुन देणे प्रतिग्राहिता यांचेवर बंधनकारक राहील.
८. प्रतिग्रहीता यांनी सदर आदेशातील वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.
९. संस्थेने वरील अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर जमीन शर्तभंगात काढून घेवून सरकार जमा केली जाईल.

(डॉ राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी पुणे

**प्रति,**

अध्यक्ष, सरहद
रा. सरहद भवन, पुणे-कश्मिर मैत्री चौक, सं.नं. ७९/८१अ (जुना) ७४/४,७९,८०,८१ (नवीन)
भारती विदयापीठाचे मागे, कात्रज पुणे ४११०४६

sarhad

(१०)

वाचले :- शासन,महसूल व वन विभाग,यांचेकडील ज्ञापन क्रमांक जमीन३४२०००/१५०६/ प्र.क्र.पु. २१८७/ज-५, दिनांक ६ मार्च, २००२

---- 0 ----

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
महसूल शाखा
क्रमांक पमह/ ४७७ /तीन,
पुणे-१,दिनांक १८/०३/२००२

विषय:- जमीन पुणे
मौजे कात्रज,ता.हवेली, येथील स.नं.७९ -८१-८०-७६/४
( जुना स.नं.१३०ते १३३) मधील जमीन सरहद
या संस्थेला , शैक्षणिक प्रयोजनासाठी मंजूर करणेबाबत.

आ दे श:-

शासन,महसूल व वन विभाग,यांचेकडील ज्ञापन क्रमांक जमीन ३४२०००/१५०६/प्र.क्र.पु.२१८७/ज-५, दिनांक ६ मार्च, २००२ अन्वये मौजे कात्रज ता.हवेली जिल्हा पुणे येथील स.नं.७९-८१-८०-७६/४ (जुना स.नं.१३० ते १३३) च्या अभिन्यासातील ब्लॉक ग च्या सुधारित रेखांकनातील (रेखांकन/नकाशा क्रमांक पी ५/२००१) ७ भूखंडापैकी अ.क्र. ३ मधील ४००० चौ.मी.जमीन सरहद संस्थेला प्राथमिक /माध्यमिकशाळेच्या इमारतीसाठी,ग्रंथालय, मुलां-मुलींचे व विधवा स्त्रियांचेवसतीगृह व तदअनुषंगिक इतर इमारतीच्या बांधकामासाठी महाराष्ट्र जमीन महसूल(सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम , १९७१ मधील नियम ५ व ६ अन्वये व शासन निर्णय, महसूल व वन विभाग,क्रमांक एलआरएफ ३४८३/३५२१८/३२७६/ग-६, दिनांक १ जुलै १९८५ मधील तरतुदीनुसार दिनांक १/२/१९७६ रोजी अस्तित्वात असलेल्या बाजार मूल्याच्या २५ टक्के इतकी रक्कम किंवा अशा जमिनी संपादित करताना शासनाने केलेला खर्च अधिक भूसंपादनात अशा जमिनीच्या विकासनासाठी शासनातर्फे काही खर्च करण्यात आला असल्यास तो जमिनीचा विकासाचा शासकीय खर्च या सर्वांची एकूण रक्कम या दोन रक्कमामध्ये जी जास्त असेल ती आकारुन नेहमीच्या अटी व शर्तीवर व जिल्हाधिकारी,पुणे यांना योग्य वाटतील अशा इतर अटी व शर्तीवर मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

सबब,उक्त नमूद शासनाकडील ज्ञापनास अधिन राहून व ज्ञापनात नमूद केलेल्या अटींनुसार महाराष्ट्र जमीन महसूल(शासकीय जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ नुसार मी, जिल्हाधिकारी,पुणे मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मौजे कात्रज,ता.हवेली जिल्हा पुणे येथील स.नं.७९-८१-८०-७६/४ (जुना सं.नं.१३० ते १३३)च्या अभिन्यासातील ब्लॉक ग च्या सुधारित रेखांकनातील (रेखांकन/नकाशा क्रमांक पी ५/२००१) ७ भूखंडापैकी अ.क्र. ३ मधील ४००० चौ.मी.जमीन सरहद संस्थेला प्राथमिक /माध्यमिकशाळेच्या इमारतीसाठी, ग्रंथालय, मुलां-मुलींचे व विधवा स्त्रियांचेवसतीगृह व तदअनुषंगिक इतर इमारतीच्या बांधकाम या वापरासाठी खालील अटी व शर्तीवर प्रदान करणेचे आदेश देत आहे.

१. प्रतिग्राहिता जमीनीचे दिनांक १/२/१९७६ चे सहायक संचालक, नगररचना यांचेकडून निर्धारित होणारे मूल्य व विषयांकित जमीन संपादित करताना शासनाने केलेला खर्च अधिक भू-संपादनात अशा जमिनीच्या विकसनासाठी शासनातर्फे काही खर्च करण्यात आला असल्यास त्यानुसार जमिनीच्या विकासनाचा एकूण शासकीय खर्च या दोन रकमामध्ये जी जास्त रक्कम असेल ती रक्कम भरणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२. प्रतिग्राहिता संस्थेला ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात आली आहे त्याच प्रयोजनासाठी जमीनीचा वापर करावा।

३. विषयांकित जमीनीबाबत रिट याचिका क्रमांक ६७१०/२००० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७/१/२००२ अन्वये दिलेल्या आदेशावर संबंधितांने मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल केले असल्यास सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय प्रतिग्राहिता संस्थेवर बंधनकारक राहील.

४. संस्थेला शाळा सुरु करण्याची परवानगी एका वर्षात न मिळालेस नियमानुसार सदर जमीन शासन ताब्यात घेईल.तसेच जागेचा वापर संस्था दोन वर्षाच्या आंत सुरु करेल, व योग्य त्या सक्षम प्राधीका-याकडून बांधकाम आराखडे मंजूर करुन घेईल

५. संस्था जमीन नवीन शर्तीवर धारण करील व ज्या कारणासाठी जमीन प्रदान केली आहे त्याच कारणासाठी त्याचा वापर करेल व त्या व्यतिरिक्त शासनाचे पूर्व परवानगीशिवाय वापर करता येणार नाही. तसेच प्रतिग्राहिता मंजूर क्षेत्र भोगवटादार वर्ग २ म्हणून धारण करेल.

६. प्रतिग्राहिता जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय जमीन किंवा तिचा कोणताही भाग गहाण ठेवणार नाही, विकणार नाही, अभिहस्तांकित किंवा अन्यथा हस्तांतरित करणार नाही. तसेच प्रतिग्राहिता जमिनीचा ताबा जमीन जशी आहे त्या स्थितीत धारण करेल. व जागेचा विकसन खर्च करेल.

७. प्रतिग्राहिता संस्थेमध्ये जात, धर्म, लिंग व पंथ याबाबत भेदभाव न करता सर्वांना प्रवेश देईल.

८. प्रतिग्राहित्याकडून सदर आदेशातील एक अथवा अनेक अटीचा/शर्तीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास प्रतिग्राहित्यास मंजूर केलेली जमीन कोणतीही नुकसान भरपाई न देता विहित मुदतीत नोटीस देवून जमीन काढून घेण्यास प्रतिग्राहिता पात्र ठरेल किंवा प्रतिग्राहित्याकडून काढून घेणेत येईल.

९. प्रतिग्राहिता सदर आदेशातील सर्व अटी मान्य असलेबाबत ताबा घेणेपूर्वी रक्कम रुपये ५० चे स्टॅम्पवर प्रतिज्ञापत्र (हमीपत्र) करुन देईल.

THE COLLECTOR PUNE

सही/-[ मधुकर कोकाटे ]
जिल्हाधिकारी, पुणे

प्रति:-

मा. अध्यक्ष सरहद
ओम गुरुदत्तहौसिंग सोसायटी स न ११ अ
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे ४३

प्रत:- तहसिलदार हवेली यांजकडेस :-

२/- सदर जमिनीचे दिनांक १/२/१९७६ चे मूल्यांकन सहायक संचालक, नगररचना पुणे यांचेकडून निर्धारित करुन घेवून त्यानुसार येणारी जमिनीची किंमत तसेच जमिन संपादित करताना शासनाने केलेला खर्च अधिक भू-संपादनात अशा जमिनीच्या विकासनासाठी शासनातर्फे काही खर्च करण्यात आला असल्यास तो जमिनीचा विकासाचा शासकीय खर्चानुसार येणारी रक्कम अथवा या दोन रक्कमामध्ये जी जास्त रक्कम असेल ती रक्कम आकारुन संस्थेकडून जमिनीचा ताबा देणेपूर्वी भरुन घ्यावी. त्याचप्रमाणे रिट याचिका क्रमांक ६७१०/२००० मधील मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७/१/२००२ चे आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपील झाले अगर किंवा कसे व झाले असल्यास स्थगिती आहे किंवा कसे याची खात्री संस्थेस जमिनीचा ताबा देणेपूर्वी करावी. त्याचप्रमाणे आदेशातील अट क्रमांक नुसार संस्थेकडून हमीपत्र घेतलेनंतर जमिनीची मोजणी करुन ताबा देणेची कार्यवाही करावी. व पूर्तता अहवाल सादर करावा. सोबत मूळ चौकशी संचिका जोडली आहे.

प्रत:- मा.अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ३२

प्रत:- मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे-१ यांना माहितीसाठी सादर.

प्रत:- उपविभागीय अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांजकडेस माहिती व कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी, पुणेकरिता